संक्षिप्त फौ. ख. क्र.५३९/२०२५
सरकार -वि.- अनिल सोलंकी
नि.क्र. ६ खाली .

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी ८

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - दिपक केशव ढोले,
वय ३४ वर्षे, व्यवसाय – पोलीस शिपाई ब.क्र.२२२०,
राहणाार - पोलीस स्टेशन भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री जी.बी.राऊत यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. दिनांक २६.०६.२०२५ रोजी मी पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मी, पो.शि. मनोज चाचरे, पो.शि. वासुदेव समर्थ, पो.शि. निकेश आरिकर यांच्यासह जवळी परिसरात पेट्रोलिंग करत होतो. त्यावेळी मुखबीरव्दारे खबर मिळाली की, एक व्यक्ती टाका परिसरात दारु विक्री करत आहे. त्यानंतर मी दोन पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.७** देण्यात येते. त्यानंतर आम्ही पंचांसह टाका शिवारातील एका शेतात गेलो. तेथे पिवळ्या पालाच्या झोपडीमध्ये उभे राहून त्याला आवाज दिला. त्याला त्याचे नाव विचारता त्याने त्याचे नाव अनिल सुरभी सोलंकी असे सांगितले. त्याच्या झोपडीची झडती घेतली असता १८० मि.ली.च्या देशी दारुच्या १० निपा मिळून आल्या. त्याला परवाना विचारता त्याने नकार दिला. त्यानंतर जप्त केलेल्या निपांपैकी एक १८० मि.ली.ची निप वेगळी काढून रासायनिक परिक्षणाकरिता सिलबंद केली त्यानंतर त्या निपा जप्त करुन घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.८** देण्यात येते. त्यानंतर सी.ए.फार्म तयार केला. आता मला दाखवलेला सी.ए. फार्म तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.

त्यास **नि.क्र.९** देण्यात येते. त्यानंतर पोलीस स्टेशनला येवून फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.१०** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.११** देण्यात येते.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

२. मी जप्त केलेल्या ठिकाणाचा आरोपीच्या मालकी संदर्भात कागदपत्र जप्त केले नाही व बयानही घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या दिवशी पेट्रोलिंग करत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सी.ए. परिक्षणाकरीता एक बॉटल वेगळी काढली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी सी.ए. परिक्षणाकरिता पत्र दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी केसेसचा टार्गेट पुर्ण करण्यासाठी खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ०२.०२.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.